# जनसंपर्क अधिकारी

पोलीस आयुक्त, मिरा-भाईंदर, वसई-विरार यांचे
कार्यालय रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व, जि. ठाणे
दुरध्वनी क्र. ०२२-२९४५१००१
E-mail: pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in

प्रेस नोट क्र-७३ दिनांक - ०२/०३/२०२४

## चोरीच्या गुन्हयातील सराईत आरोपीतास अटक – मिरारोड पोलीस ठाणेच्या गुन्हे प्रकटीकरण पथकाची कामगीरी

१. मिरारोड पोलीस ठाणे कार्यक्षेत्रात राहणा-या फिर्यादी नामे श्रीमती प्रिती चंद्रकांत कारेकर वय.४४ वर्षे रा.बी/३१/२०२ प्लाझा विहार, शांतीपार्क, शिवाली गार्डन रेस्टॉरंट आणि बार मिरारोड पुर्व ता.जि.ठाणे यांनी दिनांक ०१/०३/२०२४ रोजी फिर्याद दिली कि, फिर्यादी यांचे मालकीची टाटा एस (छोटा हत्ती) क्र.एम.एच.४८.ए.वाय.४२२४ हा शिवाली गार्डन रेस्टॉरंट आणि बार येथे बिल्डींगचे बाहेर सार्वजनिक रोडवर उभा असतांना यातील आरोपीत यांने फिर्यादी यांचे टेम्पो मधील ०३ बॅट-या, एक स्टीलचा कपाट असा एकुण ९७,०००/- रु किमतीचा मुद्देमाल फिर्यादी यांचे संमतीशिवाय चोरी करुन नेला म्हणुन फिर्यादी यांनी दिलेल्या फिर्यादी वरुन **मिरारोड पोलीस ठाणे गु.रजि.नं. I ६८/२०२४ भा.द.वि.सं.कलम ३७९, ४२७ प्रमाणे** गुन्हा दाखल करण्यात आला होता.

नमुद गुन्हा हा अनोळखी आरोपीताने केला असल्याने तो उघड होण्याकरीता मा.वरीष्ठांना गुन्हे प्रकटीकरण पथकातील अधिकारी व अंमलदार यांना सुचना दिल्या. त्याप्रमाणे गुन्हे प्रकटीकरण पथकातील अधिकारी व अंमलदार यांनी गुन्हयाचे घटनास्थळी भेट देवुन घटनास्थळी भेट देवुन गोपनिय बातमीदारांना अवगत केले असता गोपनिय बातमीदारांकडुन मिळालेल्या माहिती कि, सदरचा गुन्हा हा मिरा भाईंदर परिसरातील चोरी व घरफोडी चे गुन्हे करणारा सराईत आरोपी आरबाज ईस्माईल शाह वय.२४ वर्षे, रा.मकसुद चाळ, मुन्शी कंम्पाउड, काशिमिरा, मिरारोड पुर्व ता.जि.ठाणे याने केला असल्याची खात्रीशीर माहिती मिळाल्याने नमुद आरोपीत याचा शोध घेवुन त्यास अटक करण्यात आली असुन गुन्हयात चोरी केलेला १०० टक्के मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे.आरोपीत याचेवर इकडील आयुक्तालयातील अभिलेखावर यापुर्वी एकुण ६ गुन्हे दाखल आहेत.

## घरफोडी करण्याच्या तयारीत असणाऱ्या ईसमांना अटक

२. दिनांक ०१/०३/२०२४ रोजी मिरारोड पोलीस ठाणे गुन्हे प्रकटीकरण पथकातील अधिकारी व अंमलदार मिरारोड पोलीस ठाणे कार्यक्षेत्रात गुन्हे प्रतिबंध गस्त करीत असतांना गोपनिय बातमीदाराकडुन मिळालेल्या माहितीच्या आधारे दोन संशयित इसमांना ताब्यात घेवुन त्यांचेकडे विचारपुस केली असता त्यांनी त्यांचे नाव १) सागर दिपक सोनी वय.२२ वर्षे, रा.फिरस्ता काशमिरा फ्लायओव्हर ब्रिज खाली काशिमिरा नाका, मिरारोड पुर्व ता.जि.ठाणे व २) अजय अनिता पटेल वय.२१ वर्षे रा.गल्ला नं.०८, भरत कंम्पाऊंड झोपडपट्टी, मांडवी पाडा, काशिमिरा, मिरारोड पुर्व ता.जि.ठाणे असे सांगितले तसेच त्यांचे ताब्यात एक लोखंडी हतोडा व एक लोखंडी छनी असे घरफोडी करीता वापरण्यात येणारे हत्यार मिळुन आले नमुद आरोपी हे घरफोडी, चोरी गुन्हा करण्यासाठी एकत्र जमल्याचे निर्दशनास आले आहे. म्हणुन

सदर इसमांनी घरफोडी, चोरी करण्याच्या उद्देशाने एकत्र येवुन सवयीने अशाप्रकारचे गुन्हे करीत असल्याने त्यांचेविरोधात मिरारोड पोलीस ठाणे गु.रजि.नं. I ७०/२०२४ भा.द.वि.कलम ४०१ प्रमाणे गुन्हा नोंद करुन अटक करण्यात आली आहे.

**आरोपी १) सागर दिपक सोनी वय.२२ वर्षे याचेवर यापुर्वी खालीलप्रमाणे गुन्हे नोंद आहेत.**

१) मिरारोड पोलीस ठाणे गु.रजि.नं. I ३४६/२०२१ भा.द.वि.कलम ३७९,५११,३४ प्रमाणे

२) भाईंदर पोलीस ठाणे गु.रजि.नं. I १७७/२०२० भा.द.वि.कलम ४५७,३८०,३४ प्रमाणे

**आरोपी २) अजय अनिता पटेल वय.२१ वर्षे याचेवर खालीलप्रमाणे गुन्हे नोंद आहेत.**

१) मिरारोड पोलीस ठाणे गु.रजि.नं. I ३४६/२०२१ भा.द.वि.कलम ३७९,५११,३४ प्रमाणे

सदरची कामगिरी श्री.प्रकाश गायकवाड, पोलीस उप आयुक्त, परिमंडळ ०१, मिरारोड पुर्व, डॉ. श्री. विजय मराठे, सहाय्यक पोलीस आयुक्त, मिरारोड विभाग यांचे मार्गदर्शनाखाली मिरारोड पोलीस ठाणेचे वरीष्ठ पोलीस निरीक्षक श्री. चंद्रकांत सरोदे, पोलीस निरीक्षक श्री. राहुलकुमार पाटील (गुन्हे), गुन्हे प्रकटीकरण पथकाचे सपोनि/संतोष सांगवीकर, पोउपनि/किरण वंजारी, पोहवा/प्रफुल्ल महाकुलकर, बालाजी हरणे, परेश पाटील, पो.अमं.शंकर शेळके, अथर्व देवरे यांनी केलेली आहे.

**----0000----**